नवीन सेवार्थ प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने **मध्यम व लघु आस्थापना** असलेल्या सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांतर्गत पुणे विभागातील सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना द्यावयाच्या सूचना...

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२९(१)/कोषा प्रशा-४**
**दालन क्रमांक ३३९, ३ रा मजला, मादाम कामा मार्ग**
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक: २२ मे, २०२६

**वाचा:**-१. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२९/कोषा प्रशा-४, दि.०१.०४.२०२६

**प्रस्तावना** -

**वाचा क्र.१** येथील परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे (I) पुणे विभागातील सर्व कोषागारातील मध्यम व लघु आस्थापना असलेल्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना दिनांक १०.०४.२०२६ पर्यंत पूर्णपणे प्रशिक्षण देण्यात येवून डेटा मायग्रेशन करण्यात आला आहे. (II) या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना माहे एप्रिल, २०२६ देय माहे मे, २०२६ करीता नवीन सेवार्थ प्रणालीमध्ये पायलट रन करण्यासाठी सूचीत करण्यात आले होते. त्यानुसार प्रत्यक्ष नवीन सेवार्थ प्रणालीमधून यांना माहे मे, २०२६ देय माहे जुन, २०२६ पासून नियमित वेतन देयके संस्करीत करण्यासाठी सुचित करण्यात आले आहे. (III) माहे मे, २०२६ देय जुन, २०२६ पासून या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना जुन्या सेवार्थ प्रणालीमध्ये कामकाज करता येणार नाही, असे देखील सूचीत करण्यात आले होते.

तथापि, सदर आहरण व संवितरण अधिकाऱ्यांचा डेटा मायग्रेट करुनसुध्दा काही आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून पुढील कामकाज विहीत वेळेत पूर्ण करीत नसल्याचे दिसून आले आहे.

उपरोक्त बाबी पाहता, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांतर्गत पुणे विभागातील आहरण व संवितरण अधिकारी यांना पुनश्च खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

**शासन परिपत्रक :-**

१. पुणे विभागातील सर्व कोषागारातील मध्यम व लघु आस्थापना असलेल्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना माहे मे २०२६ देय जुन २०२६ पासून केवळ नवीन सेवार्थ प्रणालीतून देयके संस्करीत करावयाची आहेत. सदर आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना जुन्या सेवार्थ प्रणालीमध्ये कामकाज करता येणार नाही.

२. तसेच सदर कामकाज विहित वेळेत पूर्ण केले नसल्यास, त्यामुळे माहे मे २०२६ देय जुन २०२६ ची मासिक वेतन देयके तयार करण्यास व त्यानंतर वेतन उशिरा झाल्यास त्याला वित्त विभाग जबाबदार राहणार नाही.

२.	सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०२६०५२२१४२४०२३३०५ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

ASHOK GULAB CHAUDHARI

Digitally signed by ASHOK GULAB CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT,
2.5.4.20=3A31F1E61A49658347833C8C22A09CB8141A51CF08DA760FD5E2A1B3C1769153, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=3E9FA04602558FF79EC2FCB3553E7DA28D75751FAA9AA5AA2261D3E69F011558, cn=ASHOK GULAB CHAUDHARI
Date: 2026.05.22 14:25:03 +05'30'

(अशोक चौधरी)
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

**१. पुणे विभागांतर्गत सर्व आहरण व संवितरण अधिकारी / जिल्हा कोषागार अधिकारी / उप कोषागार अधिकारी.**

**२. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.**

**यांना विनंती करण्यात येते की, पुणे विभागातील त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना सदर परिपत्रकातील सूचनांचे पालन करण्याबाबत मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या स्तरावरुन देखील कळविण्यात यावे.**

प्रत-

१. मा. राज्यपाल यांचे सचिव / प्रधान सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव / प्रधान सचिव / अपर मुख्य सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव / प्रधान सचिव.
४. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
६. सर्व मा. विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य.
७. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या अधिनस्त असलेले सर्व विभाग प्रमुख / प्रादेशिक कार्यालय प्रमुख / कार्यालय प्रमुख
८. प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
९. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई
१०. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
११. महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
१३. आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई
१४. आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन, नागपूर
१५. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई
१६. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१७. सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई
१८. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१९. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
२०. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२१. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली

२२. सर्व विभागीय आयुक्त
२३. सर्व जिल्हाधिकारी
२४. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२५. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
२६. संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकणभवन, नवी मुंबई
२७. सहसंचालक, लेखा व कोषागारे, कोकण/पुणे/नाशिक/ छत्रपती संभाजी नगर/अमरावती/नागपूर
२८. सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकण/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजी नगर / अमरावती / नागपूर
२९. वित्त विभागातील सर्व कार्यासने
३०. निवड नस्ती/कोषा प्रशा-४